(२)

# प्रेस नोट

मा.सर्वोच्च न्यायालयाने रिट पिटीशन (सिव्हिल) क्रमांक ८५७ / २०१५ या याचिकेच्या सुनावणी दरम्यान उत्तर प्रदेश, मध्य प्रदेश व इतर अशा दहा राज्यांच्या दुष्काळी परिस्थितीचा आढावा घेतला व या दुष्काळग्रस्त राज्यांमध्ये विविध उपाययोजना राबविण्याबाबत सुचना दिल्या आहेत. सदर दुष्काळग्रस्त राज्यामध्ये महाराष्ट्राचा देखिल समावेश आहे. राष्ट्रीय अन्न सुरक्षा योजना कायदा, २०१३ नुसार स्वस्त दराने अन्न-धान्याचा पुरवठा करण्यात येतो किंवा कसे या अनुषंगाने मा.सर्वोच्च न्यायालयाने रिट पिटीशन (सिव्हिल) क्रमांक ८५७ / २०१५ मध्ये दिनांक १८.१.२०१६ च्या आदेशानुसार सुचना केल्या होत्या. त्यामध्ये राष्ट्रीय अन्न सुरक्षा योजना कायदा , २०१३ नुसार आवश्यक अंमलबजावणी करण्याचे निदेश देण्यात आले आहेत. तसेच राज्यात दुष्काळाच्या अनुषंगाने जमीन महसुलात सुट, सहकारी कर्जाचे रुपांतरण, वीज बिलात सुट, परिक्षा शुल्क माफि, शेतीकर्जाच्या वसुलीस स्थगिती, जनावरांना चारा, पाणी, चारा उत्पादन, मीड डे मील, मनरेगा, तुरडाळ, गोडे तेल, दुध, अंडी, इत्यादी बाबी जनतेपर्यंत पोहोचतात किंवा नाही या बाबींची माहिती विचारण्यात आली होती.

उपरोक्त रिट पिटीशनच्या अनुषंगाने मा.सर्वोच्च न्यायालयात अद्याप परिच्छेद निहाय अभिप्राय दाखल करण्यात आलेले नसून आवश्यक टिप्पणी मात्र संबंधित वकीलांकडे देण्यात आली आहे. दुष्काळी परिस्थितीमुळे झालेल्या नुकसानीसाठी दिनांक ९.११.२०१५ च्या पत्रान्वये रु.४००२.८३ कोटी इतक्या मदतीचा प्रस्ताव केंद्र शासनास सादर करण्यात आला होता. केंद्र सरकारकडून दिनांक १३.१.२०१६ च्या पत्रान्वये रु.३०४९.३६ कोटींची मदत महाराष्ट्र शासनाला देण्यात आली आहे. त्यापैकी दिनांक १९.१.२०१६ च्या पत्रान्वये २५% निधी रु.६३७.१८ कोटी उपलब्ध करुन दिला आहे.

*******

३०.६.१९९२ च्या धोरणानुसार किंमत न आकारता शासन निर्णय दिनांक ८.२.१९८३ व ११.५.१९८४ च्या धोरणानुसार किंमत आकारण्याची शासनास विनंती केली होती. सदर विनंतीवर शासनाने विचार केल्यावर असा निर्णय घेतला आहे की, दिनांक १०.६.१९९२ चे धोरण हे उच्च शिक्षण / महाविद्यालयांना जमीन देण्यासाठी लागू असल्याने व वरील संस्थांचे कार्य हे सांस्कृतिक (सामाजिक प्रयोजनात / नफा न मिळणा-या संस्था ) असून सदर संस्था दिनांक ८.२.१९८३ व दिनांक १५.५.१९८४ च्या धोरणात बसतात. त्यामुळे विचाराधीन संस्थांना दिनांक १.२.१९७६ च्या बाजारभावाच्या २५ टक्के रक्कम आकारुन कब्जेहक्काचे जमीन मंजूर करण्यात यावी.

वरीलप्रमाणे शासनाने निर्णय घेतला असून त्याप्रमाणे त्वरित कार्यवाही करावी.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने

सही/-
( शिवाजी पाटणकर )
कार्यासन अधिकारी
महसूल व वन विभाग

प्रति,
जिल्हाधिकारी, मुंबई उपनगर, प्रशासकीय इमारत, वांद्रे (पूर्व), मुंबई .५१
प्रतिलिपी,

१. आयुक्त, कोकण विभाग
२. जमाबंदी आयुक्त व संचालक भूमि अभिलेख, महाराष्ट्र राज्य, पुणे
३. महालेखापाल, महाराष्ट्र राज्य, मुंबई / नागपूर
४.महालेखापाल, महाराष्ट्र राज्य, मुंबई / नागपूर (लेखा व अनुज्ञेयता)
५. सहायक संचालक, नगररचना (मुल्य निर्धारण), मुंबई
६. वित्ती विभाग, व्यय-९, मंत्रालय, मुंबई ३२
७.निवड नस्ती ज-३ कार्यावन महसूल व विभाग